जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

26 APR 2017 लोकमत

# 'अमर', 'उमंग' नियतकालिके ठरली अव्वल

## शिवाजी विद्यापीठाची स्पर्धा : ८८ महाविद्यालयांचा उल्लेखनीय सहभाग

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाने घेतलेल्या नियतकालिक स्पर्धेमध्ये बिगर व्यावसायिक गटात देशभक्त आनंदराव बळवंतराव नाईक आर्ट्स अँड सायन्स कॉलेजचे 'अमर', तर व्यावसायिक गटात संजय घोडावत ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्सचे 'उमंग' या नियतकालिकाने प्रथम क्रमांक पटकाविला.

सन २०१५-१६ मध्ये झालेल्या स्पर्धेतील विजेत्या महाविद्यालयांचे प्राचार्य व संपादकांना फिरते चषक व प्रशस्तीपत्र प्रभारी प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सभागृहातील या कार्यक्रमास अधिष्ठाता डॉ. वासंती रासम, पी. डी. राऊत, पी. एस. पाटील, ए. एम. गुरव, प्राचार्य डॉ. एस. आर. पाटील, हिंदुराव पाटील, शिरीष पवार, व्ही. ए. रायकर, ए. के. गुप्ता, आदी उपस्थित होते. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी स्वागत केले. सुस्मिता खुटाळे यांनी आभार मानले.

या स्पर्धेत बिगर व्यावसायिक गटात सर्वसाधारण विजेता पुरस्कार देशभक्त आनंदराव बळवंतराव नाईक आर्टस् अँड सायन्स कॉलेज, चिखली (जि. सांगली) यांच्या 'अमर' (संपादक डॉ. प्रकाश दुकळे) या नियतकालिकाने, तर व्यावसायिक गटात सुशिला दानचंद घोडावत चॅरिटेबल ट्रस्टच्या संजय घोडावत ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्स, अतिग्रे (ता. हातकणंगले) यांच्या 'उमंग' (संपादक योगश धुळुगडे) या नियतकालिकाने प्रथम क्रमांक पटकाविला. बिगर व्यावसायिक गटात द्वितीय क्रमांक कोल्हापुरातील विवेकानंद महाविद्यालयाच्या 'विवेक'ने, तर तृतीय क्रमांक पाटण (जि. सातारा) येथील बाळासाहेब देसाई महाविद्यालयाच्या 'दौलत'ने (संपादक डॉ. बापूराव व्ही. जाधव) मिळविला. व्यावसायिक गटात आष्टा (ता. वाळवा) येथील अण्णासाहेब डांगे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीच्या 'ज्ञानदा'ने (संपादक सचिन चव्हाण) द्वितीय, तर जयसिंगपूरच्या डॉ. जे. जे. मगदूम कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या 'व्हर्व्ह' (संपादक प्रा. प्रशांत पाटील) या नियकालिकाने तृतीय क्रमांक मिळविला. (प्रतिनिधी)



शिवाजी विद्यापीठाच्या नियतकालिक स्पर्धेतील व्यावसायिक गटात अतिग्रे येथील संजय घोडावत ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्सने प्रथम क्रमांक पटकविला. प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. रायकर, 'उमंग'चे संपादक योगेश धुळुगडे यांना चषक देऊन गौरविण्यात आले.

### वैयक्तिक पारितोषिकांसाठी २९१ विद्यार्थ्यांची निवड

- विद्यापीठाच्या या नियतकालिक स्पर्धेत ७३ बिगर व्यावसायिक व १५ व्यावसायिक अशी एकूण ८८ महाविद्यालये सहभागी झाली. त्याचप्रमाणे स्पर्धेत १२७ विद्यार्थी व १६४ विद्यार्थिनी अशा एकूण २९१ विद्यार्थ्यांची वैयक्तिक पारितोषिकांसाठी निवड करण्यात आली.
- विजेत्यांच्या बक्षिसापोटी सुमारे ८७ हजार ४९८ रुपये इतक्या रकमेचे धनादेशाद्वारे वितरण केले आहे. ही संख्या समाधानकारक असली, तरी अद्यापही स्पर्धेच्या परिघापासून दूर असलेल्या महाविद्यालयांनीही या स्पर्धेत सहभागी होण्याची गरज आहे.

जनसंपर्क कक्ष
26 APR 2017 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. मगदूम अभियांत्रिकी नियतकालिक स्पर्धेत तृतीय

**जयसिंगपूर / प्रतिनिधी :**

येथील डॉ. जे. जे. मगदूम अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या नियतकालिक 'व्हर्व' ने शिवाजी विद्यापीठ संलग्न महाविद्यालयातील नियतकालिक स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकावून यश संपादन केले.

प्रभारी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. नियतकालिक स्पर्धेत डॉ. जे. जे. मगदूम अभियांत्रिकीच्या नियतकालिक 'व्हर्व'ने सलग पाच वर्षे शिवाजी विद्यापीठाच्या नियतकालिक स्पर्धेत प्रथम तीन क्रमांकाची पारितोषिके मिळवून यश संपादन केले आहे. गेली १० वर्षे शेकडो विद्यार्थ्यांनी या स्पर्धेमध्ये वैयक्तीक पारितोषिके पटकाविली आहेत. शिवाजी विद्यापीठ संलग्न महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकडून चांगल्या दर्जाची वाङ्मय निर्मिती व्हावी. त्यांच्यातील सृजनशीलतेची जोपासना व्हावी, सुप्त कलागुणांना वाव मिळावा यासाठी महाविद्यालयाकडून दरवर्षी नियतकालिक प्रकाशित केले जातात.

यामध्ये हरीष बेळंगे, राहुल सावंत, पूजा जोशी, शितल बन्ने, कोमल पाटील, वैदेही अमृते, अश्विनी शिंदे, श्वेता अडगळे, सना बागवान, अजिंक्य जगताप, ओंकार नाईक, अनंत खराडे, आकाश श्रावणे, अजित शेंडगे, स्नेहल नरके, उन्मेशा भापकर, कस्तुरी चौगुले, शान्वी चौगुले या विद्यार्थ्यांनी वैयक्तिक बक्षिसे पटकावून यश संपादन केले आहे. या नियतकालिकेचे संपादक प्रा. पी. पी. पाटील, विद्यार्थी संपादक आदित्य सोकाशी तसेच सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष विजय मगदूम व उपाध्यक्षा ॲड. सोनाली मगदूम यांनी अभिवंदन केले.

जनसंपर्क कक्ष
26 APR 2017 महाराष्ट्र टाईम्स शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नियतकालिक स्पर्धेत 'अमर', 'उमंग' प्रथम

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठातर्फे आयोजिण्यात येणाऱ्या नियतकालिक स्पर्धेला मिळणारा प्रतिसाद उत्साहवर्धक असला तरी जास्तीत जास्त महाविद्यालयांनी स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांनी केले. विद्यापीठ संलग्न महाविद्यालयीन नियतकालिक स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ नुकताच झाला. त्यावेळी ते बोलत होते. स्पर्धेत बिगर व्यावसायिक गटात सर्वसाधारण विजेता पुरस्कार देशभक्त आनंदराव बळवंतराव नाईक आर्ट्स अॅन्ड सायन्स कॉलेज, चिखली (ता. शिराळा, जि. सांगली) यांच्या 'अमर' (संपादक डॉ. प्रकाश दुकळे) या नियतकालिकाने, तर व्यावसायिक गटात अतिग्रेच्या संजय घोडावत ग्रुप ऑफ इन्स्टिट्युशन्सच्या 'उमंग' (संपादक योगश धुळुगडे) या नियतकालिकाने प्रथम क्रमांक पटकाविला.

बिगर व्यावसायिक गटात द्वीतिय क्रमांक विवेकानंद महाविद्यालयाच्या 'विवेक' (संपादक डॉ. डी.ए. देसाई) या नियतकालिकाने, तर तृतीय क्रमांक पाटण (जि. सातारा) येथील बाळासाहेब देसाई महाविद्यालयाच्या 'दौलत' (संपादक डॉ. बापूराव व्ही. जाधव) या नियतकालिकाने पटकाविला.



व्यावसायिक गटात आष्टा येथील अण्णासाहेब डांगे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अॅन्ड टेक्नॉलॉजीने द्वीतीय, जयसिंगपूरच्या डॉ. जे.जे. मगदूम कॉलेज ऑफ इंजिनिअरिंने तृतीय क्रमांक प्राप्त केला.

स्वागत व प्रास्ताविक कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी केले. सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले व आभार मानले.

26 APR 2017 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**द्वितीय वर्षातील प्रवेशासाठी निर्णय : सामुदायिक प्रवेश परीक्षा कक्षाची विद्यापीठांना सूचना**

# 'अभियांत्रिकी' प्रथम वर्षाचा निकाल १० जूनपूर्वी

संतोष मिठारी • कोल्हापूर

तंत्रशिक्षण संचालनालयाच्या सामुदायिक प्रवेश परीक्षा कक्षाने राज्यातील विद्यापीठांना अभियांत्रिकी आणि औषध निर्माण्ण शास्त्र अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाचे निकाल १० जूनपूर्वी लावण्याची सूचना केली आहे. द्वितीय वर्षातील प्रवेशाची प्रक्रिया वेळेत पूर्ण व्हावी शिवाय पदविका अभ्यासक्रमांसाठी जे विद्यार्थी थेट द्वितीय वर्षात प्रवेशित होतात, त्यांचे शैक्षणिक सत्र नियमितपणे व्हावे, यासाठी संबंधितांना सूचना देण्यात आल्या आहेत.

प्रथम वर्ष पूर्ण केलेले आणि काही पदविका अभ्यासक्रमांतून अभियांत्रिकी आणि औषध निर्माण शास्त्राच्या थेट द्वितीय वर्षात दरवर्षी विद्यार्थी प्रवेशित होतात. निकाल उशिरा लागल्यास या द्वितीय वर्षातील प्रवेशाची प्रक्रिया ऑगस्ट अखेरपर्यंत सुरु राहते. त्यामुळे सप्टेंबरमध्ये या विद्यार्थ्यांचे वर्ग भरतात. त्यानंतर एका महिना गेल्यानंतर नोव्हेंबरमध्ये या विद्यार्थ्यांना पहिल्या सत्रातील परीक्षांना सामोरे जावे लागते. त्यात अनेकदा विद्यार्थ्यांसह महाविद्यालयांकडून प्रथम वर्षाच्या अभ्यासक्रमांच्या परीक्षा पुढे ढकलण्याची विनंती केली जाते. त्यामुळे शैक्षणिक वर्षाचे नियोजन कोलमडून जाते. यातून अनेकदा विद्यापीठांनी परीक्षा व निकालाबाबत घालून दिलेल्या दंडक, नियमांचे नाईलाजास्तव उल्लंघन करावे लागते. हे टाळण्यासह थेट द्वितीय वर्षात प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांना नियमितपणे अभ्यासक्रम, सत्र पूर्ण व्हावे यासाठी सामुदायिक प्रवेश परीक्षा कक्षाने अभियांत्रिकीच्या प्रथम वर्षाचे निकाल १० जूनपूर्वी लावण्याची सूचना केली आहे. याबाबतचे पत्र राज्यातील विद्यापीठांना पाठविले आहे. या कक्षाची संबंधित सूचना महाविद्यालय आणि विद्यार्थ्यांसाठी महत्त्वपूर्ण ठरणारी आहे.

## जागांची उपलब्धता समजणार

पदविका अभ्यासक्रमांचे विद्यार्थी समांतर (आडव्या) पद्धतीने अभियांत्रिकी आणि औषध निर्माणच्या द्वितीय वर्षासाठी थेट प्रवेशित होतात. प्रथम वर्षाचे निकाल निश्चित कालावधी जाहीर झाल्याने द्वितीय वर्षातील किती जागा भरल्या जातील अथवा रिक्त राहतील हे समजणार आहे. त्यातून जागा वाटपाचे प्रमाण निश्चित करता येणार आहे. रिक्त जागांवर थेट द्वितीय वर्षासाठी प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वेळेत प्रवेश प्रक्रिया राबविता येणार आहे.



## शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रात १० हजार विद्यार्थी

१ शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रात यावर्षी अभियांत्रिकीच्या प्रथम वर्षाची विद्यार्थी संख्या सुमारे नऊ हजार ५००, तर औषधनिर्माणशास्त्राचे प्रथम वर्षाचे विद्यार्थी १३०० इतके आहे.

२ सामुदायिक प्रवेश परीक्षा कक्षाच्या सूचनेनुसार संबंधित अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षाचे निकाल वेळेत लावण्यासाठी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे कामकाज सुरु असल्याचे मंडळाचे संचालक महेश काकडे यांनी सांगितले.

३ ते म्हणाले, विद्यापीठाकडून अभियांत्रिकी अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरु झाल्या आहेत. प्रमुख अभ्यासक्रमांच्या परीक्षा १५ मे, तर छोट्या अभ्याक्रमाच्या परीक्षा २३ मेपर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. या परीक्षांचा निकाल १० जूनपूर्वी लावण्यात येईल.

४ निश्चित कालावधीत निकाल लागल्याने शैक्षणिक वर्ष वेळेत सुरु होईल. संबंधित अभ्यासक्रमांच्या द्वितीय वर्षातील प्रवेशासाठी आवश्यक जागांची माहिती मिळणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 APR 2017
सकाळ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातर्फे शिष्यवृत्ती मिळालेल्या कॉमर्स कॉलेजच्या दहा विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

## कॉमर्स कॉलेजचे यश

कोल्हापूर, ता. २५ : शिवाजी विद्यापीठातर्फे नुकत्याच जाहीर झालेल्या गुणवत्ता यादीत कॉमर्स कॉलेजच्या १० विद्यार्थ्यांनी स्थान मिळविले. त्यांना शिष्यवृत्ती, प्रमाणपत्र देण्यात आले. संस्थेच्या अध्यक्ष रजनी मगदूम, उपाध्यक्ष प्रसाद कामत, सदस्य अॅड. व्ही. एन. पाटील, प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांच्या हस्ते त्यांचा सत्कार झाला. शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 APR 2017
महाराष्ट्र टाईम्स

# हबीब यांचे आज व्याख्यान

**कोल्हापूर :** महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या १४३ व्या जयंती निमित्त शिवाजी विद्यापीठातील महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासन केंद्राच्यावतीने अमर हबीब यांचे महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचा शेतीविषयक विचार आणि सद्य:स्थिती' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. हे व्याख्यान २६ एप्रिल रोजी, दुपारी १२ वाजता, वि. स. खांडेकर भाषा भवन सभागृह येथे होईल.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 APR 2017
लोकमत

# 'घाळी'च्या १४ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती

गडहिंग्लज : शहरातील डॉ. घाळी महाविद्यालयाच्या १४ विद्यार्थ्यांना प्रत्येकी ५००० रुपयांची शिवाजी विद्यापीठाची गुणवत्ता शिष्यवृत्ती मिळाली आहे. यामध्ये मृणाल कुलकर्णी, दीपाली मोरे, दीपाली संभाजी, पुष्पा पाटील, स्नेहा दड्डेकर, शीतल नंघाई, श्वेता गोईलकर, रसिका माळी, सानिया मणियार, लक्ष्मी शिंदे, पुष्पांजली शेट्यान्नावर, हिनाकौसर कम्मते, वर्षा खाडे यांचा समावेश आहे.

# सामाजिक आरोग्य धोक्यात



१८७६ मध्ये अॅलेक्झांडर ग्रॅहम बेल यांनी टेलिफोनचा शोध लावला. टेलिफोनचा वापरांमुळे व्यक्तींना प्रत्यक्ष भेटण्याची आवश्यकता उरली नाही. आजतर एका सेकंदात आपण जगात कुठेही एकमेकांशी संभाषण करू शकतो. मोबाइलच्या शोधामुळे केव्हाही, कुठेही एकमेकांशी जोडले जात आहोत. माहिती, छायाचित्रे, व्हिडिओ यांची देवाण-घेवाण करणे सोपे झाले आहे. अॅलेक्झांडर ग्रॅहम बेल यांनी आपला टेलिफोन अमेरिकेत प्रर्दशनामध्ये ठेवले असता, अरे हे मशीन बोलते, अषा आश्चर्य व्यक्त करणा-या प्रतिक्रिया देण्यात आल्या. आज मात्र हा मोबाइल फोन सर्वच कामे करत आहेत. विविध अॅपच्या द्वारे सर्व आर्थिक व्यवहार करता येणे शक्य आहे. स्मार्टफोनमुळे इंटरनेट उपलब्ध झाल्याने माहिती, ज्ञान, मनोरंजन आता चोवीस तास उपलब्ध आहे. टेलिकॉम कंपन्याच्या नवनवीन योजनांचा परिणाम, अत्यंत वेगवान आणि स्वस्तात सुविधा उपलब्ध झाली आहे. खऱ्या अर्थाने आपण परस्परांच्या संपर्कात राहू शकतो. सर्व प्रकारच्या आपत्तीमध्ये मोबाइलच्या उपयोग प्रभावीपणे होत आहे. मोबाइलवरून लोकेशन्स शोधून काढता येतात. एका बाजूने यामुळे संवाद क्रांती झाली तर दुसऱ्या बाजूने या सुविधांचा गैरवापर करणाऱ्या व्यक्तींचे प्रमाण वाढत असून याचा समाजावर परिणाम होत आहे.

अलिकडेच सर्वोच्च न्यायालयाने, केंद्र शासनाला आक्षेपार्ह, अभिरूचीहिन इंटरनेट साइट्सच्या बाबतीत स्वतंत्र यंत्रणा तयार करण्याविषयी सुचवले आहे. इंदौर येथील वकिल कमलेश वासवानी यांनी २०१३ ला दाखल केलेल्या जनहित याचिकेच्या अनुषंगाने अलिकडेच सर्वोच्च न्यायालयाने हा निर्वाळा दिला आहे. विविध आक्षेपार्य छायाचित्रे, मजकूर, व्हिडिओ हे इंटरनेटवर उपलब्ध असल्याने त्यांना, विपरित परिणाम हा लहान मुलांवर व महिलांवर होतो. त्यामुळे अशा साइट्स या ब्लॉक करण्यात याव्यात, अशी भूमिका जनहित याचिकेत आहे. स्मार्टफोनवरील इंटरनेट सुविधेमुळे अषी संकेतस्थळे बघणे सहज शक्य होत असल्याने विषेशतः युवा वर्गावर त्यांच्या नैतिक व मानसिक वर्तनावर प्रभाव पडण्याची दाट शक्यता आहे. युनायटेड नेशन्स कन्व्हेशन ऑन द राइटस ऑफ द चाइल्ड या अहवालानुसार अठरा वर्षाखालील वयोगटातील चाईल्ड असे म्हटले आहे तर ऑस्ट्रेलिया या देषामध्ये सोळा वर्षाच्या आतील मुलामुलींना चाईल्ड या वर्गवारीमध्ये घेतले जाते. चिल्ड्रेन पोर्नोग्राफ वेबसाईट्स हा जगभरात चिंतेचा विषय आहे. ऑस्ट्रेलिया, बेल्जियम, फ्रान्स, साऊथ आफ्रिका या देशांमध्ये यासंदर्भात कायदे असून १२२ देशांमध्ये चाइल्ड पोर्न संदर्भातील नियंत्रण घालणारे कायदे नाहीत. चीनच्या पाठोपाठ भारतात मोबाइलधारकांची संख्या हा जगात दुसऱ्या क्रमांकावर आहे. २०१५मध्ये भारत सरकारने ८५७ पोर्नो वेबसाइट्स ब्लॉक करण्याचा निर्णय घेतला. पण व्यक्तीचे अभिव्यक्ती स्वातंत्र्य व खाजगी जीवन जगण्याचा अधिकार यामुळे या निर्णयाची अंमलबजावणी झाली नाही. अर्थात अशा प्रकारच्या वेबसाइट्सची संख्या ही हिमनगामध्ये वरचे टोक असून उपलब्ध माहितीनुसार जगात अशा चार कोटी वेबसाइट्स आहेत. अशा सेवा देणाऱ्या असंख्य कंपन्या या भारताबाहेरच्या आहे. थोडक्यात लहान मुलांसाठीच्या आक्षेपार्ह साइट्सच्या निर्मिती, प्रदर्शन, वितरण आणि उपभोक्ता या चारही प्रक्रियेत मुलामुलींचा समावेश असून हा स्वतंत्र उदयोग आहे. आणि हा उदयोग उत्पनाचे साधन बनले आहे.

अठरा वर्षाच्या आतील मुलामुलींचे लैंगिक शोषण करणे, त्यांचे मानसिक, शारिरीक आरोग्याला धक्का पोहोचेल असे जग त्यांच्या पुढे खुले करणे, तसे करण्यास भाग पाडणे यामुळे या वयोगटातील वर्गाचे मानसिक विश्व उध्वस्त होण्यास मदत होते. अभ्यासात लक्ष न लागणे, मन विचलित होणे, झोप न येणे, अभ्यास करण्यामध्ये रस नसणे, निराशा येणे, आत्महत्येला प्रवृत्त होणे अशी भयावह मालिका सुरू होऊ शकते. त्यामुळे चाइल्ड पोर्न साइट्स किंवा इतर संकेतस्थळे यामुळे सामाजिक आरोग्य धोक्यात येत असल्याने ही धोक्याची घंटा विचारात घेणे अत्यंत आवश्यक आहे. इंटरनेट व मोबाइलच्या अतिरेकी वापरामुळे मुलांच्या झोपेवर परिणाम झाला असून त्यांच्या वर्तनामध्ये पडलेला बदल हा आता कौन्सलिंगचा नवा विषय झाला आहे. फेसबूक, इन्स्टाग्राम, व्हाट्सअॅपच्या अतिरेकी वापरामुळे, डिसऑर्डस तयार झाले असून या विषयावर संशोधन होत आहेत. भारतीय माहिती तंत्रज्ञान कायदा यातील कलम ६६ च्या वापरावर जसे वादळ उठले होते. तसे सबंधित विभाग, मंत्रालये, महिला आयोग यांनी एकत्र येऊन चाइल्ड पोर्न वेबसाइटच्या बाबतीत ठोस निर्णय घेणे आवश्यक आहे. भारतीय व्यावसायिक चित्रपटे आणि दूरचित्रवाणी मालिकांमध्ये, मुलांवर, परिणाम करणाऱ्या घटना, प्रसंग यांची जी रेलचेल आहे त्यामध्ये या वेबसाइटची भर पडली आहे. आक्षेपार्ह संकेतस्थळे ब्लॉक करणे फारसे सोपे नसले तरी अशक्यही नाही. शेवटी व्यक्तीचे खासगी जीवन जगण्याचा अधिकार हा अमर्यादित नाही, हेही विचारात घेतले पाहिजे. सार्वजनिक ठिकाणी आक्षेपार्ह वर्तन करता येणार नाही एवढाच मर्यादित अर्थ न लावता सामाजिक आरोग्य धोक्यात येणार नाही, याची काळजी घेण्याची वेळ आलेली आहे. अन्यथा मानसिक रुग्ण असलेला युवा वर्ग आपण तयार तर करत नाही ना याकडे लक्ष दिले पाहिजे.

● **डॉ. निशा मुडे-पवार**

nishapawar1968@rediffmail.com